वाचाः-

१. वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण ११.०२/प्र.क्र.१२८/आर्थोपाय दि. ०६.०६.२००८
२.ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए २०१५/प्रक्र १०/पंरा-१०/वित्त ९ दि.२५.०३.२०१५
३.ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.विकास-२०१५/प्र.क्र.५२/यो-६ दि.२७.०३.२०१५
४.ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.वि कास-२०१५/प्र.क्र.२७४/यो-६ दि.१६.१२.२०१५
५.ग्राम विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्रमांक विकास -२०१५/प्रक्र-१०/वित्त-९दिं.२३.०२.२०१८
६.ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.विकास-२०१८/प्र.क्र.२२५/यो-६दि.२२.१०.२०१८
७.ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.विकास-२०१८/प्र.क्र.२२५/यो-६दि.०१.०२.२०१९
८.ग्राम विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्रमांक विकास -२०१८/प्रक्र-२५/योजना-६/दिं-०८.०३.२०१९
९.ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.विकास-२०१९/प्र.क्र.४४/यो-६दि.२५.०७.२०१९
१०.ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.विकास-२०२०/प्र.क्र.२२५/यो-६दि.१७.०२.२०२०
११. ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्र.आयटी-२०१६/प्र.क्र.५९/मातंक दि.३१.१२.२०२०
१२. ग्रामविकास व पंचायत राज विभाग शासन निर्णय क्र.विकास-२०२४/प्र.क्र.२१४/यो-६ दि. २०.०९.२०२४

जा.क्र.जिपना/ग्राप-८/ 3852 /२०२४
कार्यालय जिल्हा परिषद नांदेड
दिनांकः 3 OCT 2024.

**प्रशासकीय मान्यता आदेश,**

ज्याअर्थी मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेली ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे बाबत {मुख्य लेखाशिर्ष २५१५१२३८ (२७)} सन २०२४-२५ या आर्थीक वर्षात सदर योजने अंतर्गत संदर्भ १२ अन्वये खालील कामांना मान्यता प्रदान केलेले आहे. संदर्भ क्र.११ नुसार सदरील कामाचा निधी LPRS (Liability Payment Register System) प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येणार आहे.

त्याअर्थी खालील ग्राम पंचायतींच्या कामांना संदर्भीय शासन निर्णयातील अटीच्या अधिन राहुन व संदर्भ क्र.१२ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार खालील दर्शविलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(रु.लाखात)

| अ.क्र. | तालुका | ग्रा.पं. चे नाव | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | बिलोली | कोल्हेबोरगाव | गाव अंतर्गत सी सी रस्ता करणे भाग-१ | ३०.०० |
| २ | बिलोली | कोल्हेबोरगाव | गाव अंतर्गत सी सी रस्ता करणे भाग-२ | ३०.०० |
| ३ | बिलोली | बेळकोणी खु | गाव अंतर्गत सी सी रस्ता व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| ४ | बिलोली | बेळकोणी खु | ग्रामपंचायत अंतर्गत नारायण गोणेवाड ते हरळक बोईनवाड यांच्या घरापर्यंत सी सी रस्ता करणे | २०.०० |
| ५ | बिलोली | गागलेगाव | गाव अंतर्गत सी सी रस्ता करणे | १०.०० |
| ६ | बिलोली | रुद्रापुर | गाव अंतर्गत सी सी रस्ता करणे | १५.०० |
| ७ | बिलोली | बेळकोणी बु | गाव अंतर्गत सी सी रस्ता करणे | १५.०० |
| ८ | मुखेड | चोंडी | गाव अंतर्गत सी सी रस्ता करणे भाग-१ | १०.०० |
| ९ | मुखेड | चोंडी | गाव अंतर्गत सी सी रस्ता करणे भाग-२ | १०.०० |
| १० | मुखेड | चोंडी | गाव अंतर्गत सी सी रस्ता करणे भाग-३ | १०.०० |
| ११ | नांदेड | पिंपळगाव निमजी | गाव अंतर्गत सी सी रस्ता करणे | १०.०० |
| १२ | उमरी | शेलगाव | समाज मंदिर दुरुस्ती करणे | २०.०० |
| | | | **एकूण** | **१९०.००** |

**अटी व शर्थी**

१. सदरील कामाबाबत प्रचलित कार्यपध्दतीनुसार अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मंजूरी, निविदा काढणे/स्वीकारणे, कार्यरंभ आदेश देणे इ.बाबतची कार्यवाही सक्षम प्राधिका-याची घ्यावी.
२. ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्र.आयटी-२०१६/प्र.क्र.५९/मातंक दि.३१.१२.२०२० नुसार कामाचा निधी LPRS (Liability Payment Register System) प्रणालीद्वारे वितरीत करण्याची जबाबदारी ही पंचायत विभाग व वित्त विभाग जि.प.नांदेड यांची राहिल.
३. वरील प्रमाणे मान्यता देण्यात येत असलेल्या पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्राम पंचायतीच्या सार्वत्रिक निवडनुका/पोट निवडणुकांसाठी आचार संहिता आमलात नाही या बाबत खात्री करावी. तसेच कामे दर्जेदार व चांगल्या प्रतीची असल्याबाबत विहित समिती/संबधिताकडुन खात्री करुन घेण्यात यावी. कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही, याची सर्व संबधितांनी दक्षता घ्यावी. याबाबत संबधित कार्यन्वयीन यंत्रणांनी दक्षता घ्यावी, अन्यथा कसुरदारांवर शासनस्तरावरुन कारवाई करण्यात येईल.

४. मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्चाच्या कामांना अतिरिक्त अनुदान दिले जाणार नाही.
५. मंजूर कामांना कार्यारंभ आदेश हा शासन निर्णयाच्या मुदतीच्या कालमर्यादितच द्यावा. या कालावधीनंतर कार्यारंभ आदेश दिल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
६. सदर मंजूर असलेले काम यापुर्वी इतर कोणत्याही योजनेतुन करण्यात आले किंवा नाही याची खातरजमा करावी.
७. सदर कामाचा आर्थिक व भौतीक प्रगती अहवाल दर महिण्याच्या पाच तारखेपुर्वी या कार्यालयास सादर करावा.
८. सदरील यादीतील मंजूर केलेली कामे मागील ५ वर्षात (२५१५१२३८) लेखाशिर्षाखाली किंवा अन्य योजनेतुन करुन घेण्यात आली नाहीत, याची गट विकास अधिकारी व उप अभियंता (बां) / कार्यकारी अभियंता (बां) यांनी खात्री करावी. जर कोणत्याही योजनेतून ५ वर्षापूर्वी अशी कामे करून घेतली असल्यास, अशा प्रसंगी ते काम सुस्थितीत आहे किंवा कसे याबाबत संबधित यंत्रणेने खात्री करुनच ती हाती घेण्यात यावी. तसेच अशी कामे अन्य योजनेतून मंजूर असून ती सुस्थितीत आढळल्यास अशा कामांची माहिती या कार्यालयास सादर करावी व त्या कामास कार्यारंभ आदेश देण्यात येवू नये .
९. सदरील कामे व कामाचा निधी हा ३१ मार्च २०२६ पुर्वी खर्च करणे बंधनकारक आहे.
१०. कामे सुरु होण्यापुर्वी जागेचे छायाचित्र व काम पुर्ण झाल्यानंतर परिपुर्ण कामाचे छायाचित्र तसेच काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती ---------ता. जि. नांदेड यांची राहील.
११. सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२ दि.१४.१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्यानुसार दोषनिवारण दायित्व कालावधी राहील त्या कालावधीचा निविदेमध्ये समावेश करण्यात यावा.
१२. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/ परिपत्रक व सुचनांचे पालन करुन नियमाप्रमाणे निविदा प्रसिध्द करणे, कार्यारंभ आदेश निर्गमित करण्याची जबाबदारी संबधित गट विकास अधिकारी पंचायत समिती/संबधित ग्रामपंचायत कार्यालय यांची राहिल.
१३. योजनेंतर्गत कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.
१४. संदर्भ क्र. २ ते १० अन्वये विहित केलेल्या कामांनाच कार्यारंभ आदेश देण्यात यावेत, तसेच योजनाबाहय कामे व जी कामे जागेचा अभाव किंवा इतर योजनांतर्गत याआधी मंजूर असतील किंवा इतर काही कारणामुळे सुरु करणे शक्य नसतील, अशा कामांची शहानिशा करुन त्या कामांची यादी एक महिन्याच्या आत या कार्यालयास सादर करण्यात यावे.
१५. कामाची गुणवत्ता व दर्जा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मानकांप्रमाणे असावीत, तशी ती नसल्यास, संबधित यंत्रणांना सामुहिकरीत्या जबाबदार धरण्यात येईल.
१६. सदरील योजने बाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/नियम यांचे पालन करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.
१७. महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता २०११ मधील सुचनांचे काटेकोर पालन करावे.
१८. सर्व कामांची लेखापरिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांची राहील.

स्वाक्षरीत/-
(मिनल करनवाल भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नांदेड

**प्रतिलीपी,**

१. कार्यासन अधिकारी, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, बांधकाम भवन मुंबई यांना माहितीस्तव.
२. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांना माहितीस्तव.
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.
४. कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद,बांधकाम विभाग **देगलूर व नांदेड** यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती **बिलोली, मुखेड, नांदेड व उमरी** योग्य त्या कार्यवाहीस्तव.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नांदेड करीता

स्थळ प्रतवर मा.मु.का.अ.यांचे स्वाक्षरी असे/-